
20 OCT 2023

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाती व्यवस्था नष्ट करण्यात आलेले अपयश चिंताजनक : डॉ. थोरात

## शिवाजी विद्यापीठात रिटा गुप्ता यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'सावित्रीबाई फुले: हर लाईफ, हर रिलेशनशीप, हर लिगसी' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत थोरात, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून रिटा राममूर्ती गुप्ता, भारती पाटील उपस्थित होत्या.

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने जाती व्यवस्थेवर प्रखर आघात केला; मात्र आज दोनशे वर्षे उलटल्यानंतरही जाती व्यवस्था नष्ट, उद्ध्वस्त करण्यात आपण यशस्वी झालेलो नाही, हे चिंताजनक आहे, अशी खंत ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंत थोरात यांनी आज येथे व्यक्त केली.

लेखिका रिटा राममूर्ती गुप्ता यांच्या 'सावित्रीबाई फुले : हर लाईफ, हर रिलेशनशिप, हर लिगसी' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. थोरात म्हणाले, 'विद्यापीठातून आता सावित्रीबाई-फातिमा शेख यांच्याविषयी संशोधनात्मक अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सावित्रीबाईंनी त्यांच्या पहिल्या फळीच्या विद्यार्थिनींवर जो शिक्षणाचा संस्कार केला, प्रभाव टाकला, त्या अनुषंगाने संशोधन होणे आवश्यक आहे.' अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. बाळ पाटणकर, इंद्रजित घोरपडे, डॉ. उषा थोरात, भगवान हिर्डेकर, अरुण शिंदे, केशव हरेल आदी उपस्थित होते.

### सावित्रीबाईंशिवाय माझ्यापुढे कोणतेही नाव नव्हते

डॉ. थोरात यांनी लेखिका गुप्ता यांना सावित्रीबाईंविषयीच पुस्तक लिहावे, असे का वाटले? अशी विचारणा केली. त्यावर गुप्ता म्हणाल्या, 'जेव्हा एका स्त्रीबाबत लिहिण्याचा निर्णय घेतला, तेव्हा सावित्रीबाईंशिवाय माझ्यापुढे कोणतेही नाव नव्हते. कोणत्याही सामाजिक बदलासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज असते. सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, सगुणाबाई क्षीरसागर या तिघी म्हणजे माझ्या दृष्टीने भारताची संकल्पना आहे.'

20 OCT 2023

लोकमत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. यशवंतराव थोरात : विद्यापीठात सावित्रीबाई फुले पुस्तकाचे प्रकाशन

# जातिव्यवस्था नष्ट करण्यात आतापर्यंत अपयशच

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्याने शूद्रातिशूद्रांना शिकवून जातीव्यवस्थेवर प्रखर आघात केला; मात्र आज दोनशे वर्षे उलटल्यानंतरही जातीव्यवस्था उद्ध्वस्त करण्यात आपण यशस्वी झालेलो नाही, हे चिंताजनक आहे, अशी खंत ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी गुरुवारी केली. 'सावित्रीबाई फुले: हर लाईफ, हर रिलेशनशीप, हर लिगसी' या पुस्तकाचे प्रकाशन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाले. रिटा राममूर्ती गुप्ता यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी लिहिलेल्या या पहिल्या इंग्रजी



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'सावित्रीबाई फुले: हर लाईफ, हर रिलेशनशीप, हर लिगसी' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंतराव थोरात यांच्या हस्ते झाले. यावेळी लेखिका रिटा राममूर्ती गुप्ता, आणि डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

पुस्तकाचे प्रकाशन श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. थोरात म्हणाले, अजूनही आपली जातमानसिकता बदललेली नाही. कनिष्ठ जातींना जे दुःख भोगावे लागले, त्याची पुसटशीही कल्पना जातव्यवस्थेच्या उतरंडीत स्वतःला उच्च स्थानी मानणाऱ्या जातींना येणार नाही. त्यामुळे त्यांच्या मानसिक स्वच्छतेची गरज आहे. त्यासाठी पुन्हा आपल्याला फुले-शाहू-आंबेडकर यांचाच मार्ग अनुसरावा लागेल. विद्यापीठांनी आता सावित्रीबाई- फातिमा शेख यांच्याविषयी संशोधनात्मक अभ्यास करण्याची आवश्यकताही डॉ. थोरात यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या पिढीतल्या सावित्रीच्या लेकीनाही आपल्या या संचिताचा अभिमान वाटला पाहिजे. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. बाळ पाटणकर, इंद्रजीत घोरपडे, डॉ. उषा थोरात, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. अरुण शिंदे, डॉ. केशव हरेल उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
20 OCT 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँका, संस्थांच्या सक्षमीकरणासाठी शिवाजी विद्यापीठाचा 'सहकार'

## लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध समस्यांच्या गर्तेत अडकलेले सहकार क्षेत्र मोडीत काढण्याचे उद्योग सुरू असताना दुसरीकडे याच सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.

विद्यापीठातील लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राने कोल्हापूर जिल्ह्यातील विविध कार्यकारी विकास सेवा संस्थाच्या बळकटीकरणाचा विडा उचलला आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना या संस्थांपर्यंत पोहोचवून त्यांना अधिक सक्षम केले जात आहे. जिल्ह्यात १८४५ विविध कार्यकारी सेवा संस्था असून, वर्षात जिल्ह्यातील ५८० विविध कार्यकारी सेवा संस्था या केंद्राशी जोडल्या आहेत. विशेष म्हणजे दीडशेहून अधिक सेवा संस्थांनी या केंद्राच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. विद्यापीठातील अर्थशास्त्र, एमबीए विभागातील विद्यार्थी अंतिम वर्षात शिक्षण घेत असताना खासगी बँकांमध्ये प्रशिक्षणाचे धडे घेतात. या विद्यार्थ्यांना सहकारी बँकांमध्येही प्रशिक्षण घेण्याची संधी मिळावी यासाठी या प्रशिक्षण केंद्राने पुढाकार घेतला आहे.

### 'अशी' होते मदत

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या सहकार्याने या प्रशिक्षण केंद्राने शाहूवाडी, पन्हाळा व करवीर तालुक्यातील १३०हून अधिक सेवा सोसायट्यांच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण दिले आहे. केंद्र, राज्य सरकारच्या सहकार विभागाच्या योजना, त्यांचे उपक्रम याची माहिती सोसायटीच्या प्रतिनिधींना समजावून सांगणे, त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी हे केंद्र मदत करते.

### बँकांसाठीही प्रशिक्षण



खासगी बँकांच्या तुलनेत सहकारी बँका कमकुवत आहेत. त्यांचेही तितक्याच प्रमाणात सक्षमीकरण करण्यासाठी या केंद्राने बँक व्यवस्थापकांसाठी विविध उपक्रम राबविले. तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करून त्यांच्यात जनजागृती केली. त्यांना जिल्हा नागरी बँक असोसिएशन यासाठी सहकार्य करत आहे.

सहकार क्षेत्राच्या सदृढीकरणासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सहकारी संस्था व बँकांपर्यंत पोहोचवणे हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे.

-प्रा. डॉ. राजन पडवळ, समन्वयक, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# विद्यापीठ भुयारी मार्गासाठी अडीच कोटींचा निधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम बाजू जोडण्यासाठी भुयारी मार्ग आणि सेवा रस्त्यासाठी अडीच कोटींचा निधी गुरुवारी देण्यात आला. यामुळे या मार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. या भागात ये-जा करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आदींना जुना पुणे-बंगळूर महामार्ग ओलांडावा लागतो. वाहनांची वाढलेली वर्दळ, वेग यामुळे अपघाताचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर हा भाग जोडण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. भुयारी मार्ग आणि सेवा रस्त्यासाठी ८ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. निधी द्यावा, असे पत्र कुलसचिवांनी २४ जुलै रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला दिले होते. त्यानुसार गुरुवारी निधी वर्ग करण्यात आला.

पुण्यनगरी

# न्यू कॉलेजला अजिंक्यपद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत वारणानगर येथे झालेल्या आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. न्यू कॉलेजच्या संघाने अंतिम सामन्यात विजयसिंह यादव कॉलेज पेठवडगाव संघाचा ५७-२६ असा पराभव केला. या विद्यार्थ्यांना चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य व्ही. एम. पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. क्रीडा विभागप्रमुख प्रा. अमर सासने व दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले.